दै. गांवकरी

अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धा : बक्षिस वितरण सोहळा – दि. ०७.०२.२००९

६ गांवकरी
रविवार
दि. ८ फेब्रुवारी २००९
संमिश्र

# पीपल्स बँकेतर्फे चित्रकला स्पर्धेचे बक्षिस वितरण

जळगाव:- येथील दी. जळगाव पीपल्स को-ऑप बँकेने अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त चित्रकला स्पर्धा घेतली. या स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षिस वितरणाचा कार्यक्रम काल झाला.

चित्रकला स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ ज्येष्ठ चित्रकार प्रभाकर कोलते यांच्याहस्ते आणि विद्याधर पानट व ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दि.७ रोजी यशवंतराव पाटील, मुक्तांगण, नेरीनाका, सरस्वती नगर, जळगाव येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यांत आले होते. बक्षिस वितरण समारंभांतर्गत प्रभाकर कोलते यांच्या 'कलेपासून कलेपर्यंत' ह्या पुस्तकाचे विद्याधर पानट व ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्याहस्ते जळगाव ात प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमात सुमती लांडे- शब्दालय प्रकाशन उपस्थित होत्या.

बँकेचे चेअरमन भालचंद्र पाटील यांनी सांगितले की, बँक अर्थकारण, समाजकारण, अर्थात सामाजिक कार्यासोबतच कलात्मक बांधिलकी या उपक्रमाव्दारे वृध्दींगत करीत आहे.

काही जगप्रसिध्द रसग्रहणाव्दारे ज्येष्ठ चित्रकार प्रभाकर कोलते यांची मुलाखत प्रा. राजू महाजन, शंभू पाटील यांनी घेतली. श्री.कोलते यांनी चित्रांचे रसग्रहण केले व आपल्या वैयक्तिक जीवनपटाच्या काही आठवणी सांगितल्या. ते म्हणाले की, त्यांना चित्रांव्दारे संस्कार मिळालेत.

प्रथम १,५०१ रूपये, व्दितीय १,००१ रू, तृतीय ७०१ रूपये आणि उत्तेजनार्थ पाच बक्षिसे प्रत्येकी २५१ रूपये प्रत्येक गटासाठी देण्यांत आलीत. सदरहू चित्रकला स्पर्धेसाठी पर्यवेक्षक म्हणून तरूण भाटे, राजु बाविस्कर, प्रदीप पवार यांचे अमनोल मार्गदर्शन लाभले होते.

सूत्रसंचालन शंभू पाटील यांनी केले. बँकेचे चेअरमन भालचंद्र पाटील, व्हा.चेअरमन जयंतीभाई दोशी, संचालक राजाभाई मयूर, तज्ज्ञ संचालक डॉ.प्रकाश कोठारी, संचालिका सौ. सुरेखा चौधरी, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटकर मान्यवर मंडळी उपस्थित होते. चित्रकला स्पर्धा बक्षिस वितरण यादी पुढील प्रमाणे- गट अ-इ. १ ली ते २ री- प्रथम रिध्दी राजेंद्र अत्तरदे (नंदीनीबाई विकास विद्यालय), व्दितीय मुग्धा ए.पेंडसे (सेंट जोसेफ स्कूल), तृतीय अपूर्वा संदीप थत्ते (विद्या इंग्लिश मिडियम स्कूल),

- गट अ-इ. ३ ली ते ४थी- प्रथम अंकिता अग्रवाल (रूस्तमजी हायस्कूल), व्दितीय- यशस्विनी के.सिसोदीया (उज्वल इंग्लिश स्कूल), तृतीय- निहार सुनिल महाजन (सेंट जोसेफ स्कूल).

- गट ब- इ.५ वी ते ७ वी- प्रथम- गायत्री विलास गायकवाड (प.न.लुंकड कन्याशाळा), व्दितीय- मकरंद गोखले (सेंट जोसेफस्कुल), तृतिय- तेजल गोपाल गुजराथी (आर.आर. विद्यालय).

- गट क- ३ ली ते इ.४थी- प्रथम- आल्हाद श्रीधर जोशी (आर.आर. विद्यालय), रोसमिन शेख (रोजलँड स्कूल), पंकज रमेश राठोड (या.दे. पाटील शाळा).

श्रवण विकास मंदिर, सावखेडा- प्रथम गजानन तायडे, गट-२ प्रथम- नितिन राजेंद्र महाजन, मुलांचे वस्तीगृह, जळगाव- प्रथम- सुरेखा मंडळे, गट-२- प्रथम मोनाली कुमावत.